# जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर

## सिध्देश्वरपेठ,सोलापूर

## जिल्हा नियंत्रण कक्ष

दूरध्वनी:०२१७-२७३१०१२ फॅक्स:०२१७-२६२११२० Email-ddmo.rfsol-mh@gov.in

जाक्र २०२०/मशा/कार्या-४/जिनिक/प्रक्र-२४/आरआर-७२३ दि.१६.०५.२०२०

वाचा:- १. भारतीय रोग साथ नियंत्रण अधिनियम १८९७

२. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम- २००५ मधील कलम ६५(१)(ब)

३. मा. आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडील पत्र क्र.राआसोम/कोरोनाविषाणू/मार्गसूचना/११५२९२/२०२० दि. ०६ मार्च २०२०

४. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील अधिसुचनाक्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.५८/ आरोग्य-५ दि. १४मार्च २०२०.

५. केंद्रीय आरोग्य व कुटूंब मंत्रालय यांचे इमआर डिव्हीजनकडील सुचना दिनांक ७/४/२०२०

६. आयुक्त सोलापुर महानगरपालिका यांचेकडील पत्र क्रं. जा.क्र. नै.आ(पै)/२४ दि. १७/४/२०२०

७. आदेश क्र २०२०/मशा/कार्या-४/जिनिक/प्रक्र-२४/आरआर-५०६ दि.१८.०४.२०२०

८. आयुक्त सोलापुर महानगरपालिका यांचेकडील पत्र क्रं. जा.क्र. नै.आ(पै)/७९ दि. १६/०५/२०२०

---

विषय:- <u>कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव रोखणेकामी उपाययोजना</u>
सोलापूर शहराकरीता कोव्हीड केअर सेंटर, कोव्हीड हेल्थ सेंटर व कोव्हीड हॉस्पिटलच्या व्यवस्थेसाठी इमारत अधिग्रहण करणेबाबत.

## सुधारित आदेश

ज्याअर्थी माहे डिसेंबर २०१९ अखेर पासून चीन देशातील वुहान शहरामध्ये कोरोना विषाणुच्या (Novel Corona Virus) प्रार्दुभावामध्ये अनेक रुग्ण मृत्युमुखी पडलेले आहे. तसेच सदर कोरोना विषाणुमुळे इटली, जपान, इराण, हॉगकॉग, दक्षिणकोरीया, अमेरिका इत्यादी देशामध्ये सुमारे १७.०० लाखांपेक्षा जास्त रुग्ण आढळले आहे.

ज्याअर्थी सदर कोरोना विषाणुने बाधित रुग्ण इतर देशांतून भारतामध्ये येत असून त्यामुळे आपल्या देशातील नागरिकांना सदर कोरोना विषाणुपासून धोका निर्माण होऊन मानवनिर्मित आपत्तीची परिस्थिती निर्माण झालेली आहे.

ज्याअर्थी सद्यस्थितीमध्ये सोलापूर जिल्हयामध्ये कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व कोरोना विषाणूचे संसर्ग रोखणेसाठी त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी उपोद्घघातील अक्र ४ मधील शासन अधिसूचनेनुसार तयार करणेत आलेल्या महाराष्ट्र कोव्हिड १९ उपाययोजना नियम २०२० अन्वये जिल्हाधिकारी सोलापूर यांना सोलापूर जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रात कोव्हीड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादूर्भाव रोखणेसाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे .

ज्याअर्थी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ६५ (१)(ब) नुसार आपत्ती कालावधीमध्ये बचाव कार्याच्या प्रयोजनार्थ कोणत्याही जमीन इमारत किंवा इमारतीचा भाग अधिग्रहण करणेची अधिकार अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांना असल्याचे तरतूद आहे.

आणि ज्याअर्थी, आयुक्त सोलापूर महानगरपालिका यांनी संदर्भ क्रं. ०८ नुसार सोलापूर शहराकरिता कोव्हीड हेल्थ सेंटर व कोव्हीड हॉस्पीटलच्या व्यवस्थेसाठी इमारत अधिग्रहण करणेचे सुधारित आदेश निर्गमित करणेबाबत विनंती केली आहे.

त्याअर्थी मी मिलिंद शंभरकर जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूर असा आदेश देतो की, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ६५ (१) (ब) मधील तरतूदीन्वये तसेच वरील उपोद्घातातील अ क्र. ०४ मधील महाराष्ट्र कोव्हिड १९ उपाययोजना नियम २०२० नियम १०-ए नुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सोलापूर शहराकरिता कोव्हीड हेल्थ सेंटर व कोव्हीड हॉस्पीटलच्या व्यवस्थेसाठी खालीलप्रमाणे विविध इमारती अधिग्रहीत करीत आहे.

## COVID CARE CENTRE (CCC)

| अ.क्र | इमारतीचे नाव | क्षमता | संदर्भ सेवेचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | सिंहगड इन्स्टीट्युट, पुणे राष्ट्रीय महामार्ग सोलापूर | ६०० | श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार केंद्र व शासकिय वैद्यकिय महाविद्यालय सोलापूर |
| २ | पोलिस प्रशिक्षण केंद्र, केगाव सोलापूर | ४९० | |
| ३ | सोलापूर विद्यापीठ सोलापूर | २५० | |
| ४ | भारतरत्न इंदीरा गांधी कॉलेज, केगाव सोलापूर | १९० | |
| ५ | ऑरकीड कॉलेज, तुळजापूर रोड हिप्परगा सोलापूर | १२० | |
| ६ | गव्हर्मेंट पॉलीटेक्नीक, सोलापूर | २४० | |
| ७ | वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सोलापूर | २८० | |
| ८ | म्हाडा इमारत, जुळे सोलापूर | ४५० | |
| ९ | ए.जी.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग | २४० | |
| १० | वाडिया हॉस्पीटल सोलापूर | ७५ | |
| | एकुण | २९३५ | |

## DEDICATED COVID HEALTH CENTRE (DCHC)- सुधारीत व्यवस्था

| अ.क्र | इमारतीचे नाव | क्षमता | उपलब्ध सोयी | संदर्भ सेवेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | ईएसआय हॉस्पिटल | ८० | तज्ञ डॉक्टर, मेडीकल स्टाफ व ऑक्सीजन | श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार केंद्र व शासकिय वैद्यकिय महाविद्यालय सोलापूर |
| २ | युगंधर हॉस्पिटल | ४० | | |
| ३ | लोकमंगल हॉस्पिटल | ५० | | |
| ४ | मुळे हॉस्पिटल | ४० | | |
| ५ | सीएनएस हॉस्पिटल | ३० | | |
| ६ | मोनार्क हॉस्पिटल | ७५ | | |
| ६ | यशोधरा हॉस्पिटल | ३० | | |
| | एकुण | ३४५ | | |

## DEDICATED COVID HOSPITAL (DCH)- सुधारीत व्यवस्था

| अ.क्र | इमारतीचे नाव | क्षमता | उपलब्ध सोयी |
|---|---|---|---|
| १ | श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार केंद्र व शासकिय वैद्यकिय महाविद्यालय सोलापूर | १२० | तज्ञ डॉक्टर, ICU, व्हेन्टीलेटर्स, बीएलएस रुग्णवाहिका |
| २ | आश्विनी हॉस्पीटल, सात रस्ता, सिव्हील लाईन्स, सोलापूर | २५० | तज्ञ डॉक्टर, ICU, व्हेन्टीलेटर्स, बीएलएस रुग्णवाहिका |
| ३ | रेल्वे हॉस्पिटल, सोलापूर | ४० | तज्ञ डॉक्टर, ICU, व्हेन्टीलेटर्स, |
| | एकुण | ४१० | |

त्यानुसार वरील तक्यामध्ये नमुद रुग्णालये / आस्थापने यांनी करोना विषाणुचा प्रादुर्भाव संपेपर्यंत आपले रुग्णालय/ संस्थेचे इमारत व परिसर तसेच रुग्णालयातील मनुष्यबळ व जीवरक्षक प्रणालीसाठी आवश्यक साधन सामग्रीचा ताबा आयुक्त सोलापुर महानगरपालिका यांचेकडे देणेत यावा. करोणा विषाणुचा प्रादुर्भाव रोखणेकामी सदरचा आदेश आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये सर्व संबंधितावर बंधनकारक राहिल.

(मिलिंद शंभरकर भाप्रसे)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूर

COLLECTOR OF SHOLAPUR

प्रति,

१. आयुक्त सोलापूर महानगरपालिका यांचेकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

२. व्यवस्थापक शासकीय / खाजगी आस्थापना / रुग्णालय / संस्था ------------------------------

प्रत:- अधिष्ठाता, वैश्यंपायन स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर

प्रत :- जिल्हा शल्यचिकित्सक, सोलापूर

प्रत:- जिल्हा आरोग्य अधिकारी, सोलापूर